तरुण भारत
Nagpur Pages | 2025-11-26 | Page- 3
epaper.tarunbharat.net

# व्यवसाय वाढीसाठी एक खिडकी योजना राबवा

## अक्षत खेतान यांची मागणी

◆ **नागपूर, २५ नोव्हेंबर**

आपल्या देशाची आर्थिक धोरणे प्रतिबंधात्मक नाहीत. ही धोरणे सर्वसमावेशक आणि उद्योग, व्यवसायवाढीवर केंद्रित असली तर उद्योगांना भरभराटीचे दिवस येतील. उद्योग, व्यवसायवाढीसाठी पोषक वातावरण तयार होण्यासाठी केंद्र सरकारने एक खिडकी योजना राबवावी, अशी सूचना एयू कॉर्पोरेट आणि कायदेशीर सल्लागार सेवा लिमिटेडचे संस्थापक अक्षत खेतान यांनी केली आहे.

ऑनलाईन व्यवहार करताना उद्योजकांनी सर्वाधिक दक्षता घेण्याची गरज आहे. गत काही वर्षांत देशभरात सायबर गुन्हेगारी वाढली आहे. यापासून बचावासाठी एयू कॉर्पोरेट आणि



कायदेशीर सल्लागार सेवा लिमिटेडच्या वतीने मार्गदर्शन केले जात आहे. गत ५ वर्षांत देशभरातील १५० कंपन्यांना प्रत्यक्षात मार्गदर्शन केल्याने लाभ झाला असल्याचे अक्षत खेतान यांनी सांगितले. कॉर्पोरेट आणि कायदेशीर सल्लागार क्षेत्रात कार्यरत अक्षत खेतान यांचे मार्गदर्शन उद्योग, व्यवसायाला पूरक ठरत आहे. ◀*(तभा वृत्तसेवा)*